**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३८२९ Email- rajesh.wadnekar@nic.in

क्रमांक:-युओआर २०२५/प्र.क्र.०६/का-४ दि:- १७ नोव्हेंबर,२०२५

प्रति,

महाप्रबंधक ,
मा.उच्च न्यायालय,
मुंबई.

विषय:-सावित्रीबाई फुले पुणे विद्यापी,पुणे येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणावर पीठासीन अधिकारी नियुक्तीबाबत.

महोदय,

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे येथील विद्यापीठ महाविद्यालय न्यायाधिकरणावरील पीठासीन अधिकारी श्री.श्रीकांत दत्तात्रय कुलकर्णी यांचा कार्यभार दि.२७.११.२०२७ रोजी संपुष्टात येत असल्याने सदर पदावर नियुक्तीच्या अनुषंगाने मुंबई/येथील मा.उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमुर्ती यांनी शिफारस केलेल्या ती व्यक्तींची नावे कळविण्याची विनंती केलेली आहे.

२. त्याअनुषगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधील कलम ८०(३) कडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यानुसार न्यायाधिकरणावर नियुक्त होणा-या पीठासीन अधिकारी यांची अर्हता/पात्रता खालीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे:-

क) उच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा होती,किंवा

ख) उच्च न्यायालयाची न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यास ती अर्हताप्राप्त आहे, असे असल्याशिवाय न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी म्हणुन नियुक्ती केली जाण्यास अर्हताप्राप्त असणार नाही,

परंतु, खंड (ख) अन्वये नियुक्त करावयाची व्यक्ती ही, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीने शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेतील असेल.

३. तरी उपरोक्त वस्तुस्थिती तसेच सदर पदावर सद्या कार्यरत असणारे पीठासीन अधिकारी यांचा कार्यभार दि.२७.११.२०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने त्या पदावर नियुक्तीच्या अनुषंगाने उपरोक्त परि.२ खाली नमूद अर्हता/पात्रता असलेल्या व मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.मुख्य न्यायमुर्ती यांनी शिफारस केलेल्या तीन व्यक्तींची नावे तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत आपणास विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(रा. सु. वडनेरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

कक्ष अधिकारी (विशि-५), उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई.